शिक्षणशास्त्र महाविद्यालयामधील शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांसाठी मृद कौशल्ये मार्गदर्शक संचाचे विकसन व त्याच्या परीणामकारकतेचा अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड साठी
पीएच.डी.पदवीकरिता सादर केल्या जाणा-या शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधक
श्री गजानन आण्णा सोलापुरे
एम.ए.,एम.एड.एम.फिल.

मार्गदर्शक
डॉ.व्यंकट के.कदम
वसंतराव नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय,शिरूर, ताजबंध

संशोधन अभ्यासकेंद्र

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

शैक्षणिक वर्ष २०२३-२४

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशील
०१	प्रस्तावना
०२	संशोधनाची गरज
०३	संशोधनाचे महत्व
०४	समस्या विधान
०५	समस्येचे स्पष्टीकरण
	५.१ संकल्पनात्मक व्याख्या ५.२ कार्यात्मक व्याख्या
०६	संशोधनाची उद्दिष्ट्ये
०७	संशोधन साहित्याचा आढावा
०८	परिकल्पना
०९	संशोधनाची गृहीतके
१०	संशोधनाची व्याप्ती
११	संशोधनाची मर्यादा
१२	संशोधनाची पद्धती
१३	संशोधन नमुना निवड
१४	संशोधनाची माहिती संकलनाची साधने व तंत्रे
१५	संशोधनाची चले
१६	संशोधनाची कार्यवाही
१७	संशोधनाचे वेळापत्रक
१८	संशोधन खर्चाचे अंदाजपत्रक
१९	संशोधन अहवाल वेळापत्रक
२०	संशोधन अहवाल प्रकरण योजना
२१	संदर्भग्रंथ

१. **प्रस्तावना** :

शिक्षकांसाठी एकापेक्षा जास्त मृद कौशल्ये महत्त्वपूर्ण आहेत.अध्ययन-अध्यापनात विद्यार्थ्यांना या कौशल्यांची माहिती होईल आणि कौशल्यांचा समावेश भावी जीवनासाठी करून एक जबाबदार नागरिक देशासाठी निर्माण करण्याचे काम शिक्षणाच्या माध्यमातून अधिक गतीने होईल. शिक्षकांमध्ये नेतृत्व कौशल्ये असणे अत्यावश्यक आहे जे विद्यार्थी, पालक, महाविद्यालयीन व्यवस्थापन आणि त्यामुळे समुदायामध्ये प्रभावीपणे काम करण्यास आणि आदर मिळविण्यास मदत करतील. शाळा आणि विद्यार्थ्यांना, प्रत्येक औपचारिक आणि अनौपचारिकपणे समर्थन देण्याची क्षमता असणे, शाळेची क्षमता वाढवते. संशोधन, मार्गदर्शक किंवा नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी शिक्षक दूरदर्शी असावा. त्यामळे शिक्षकांसाठी मृद कौशल्ये महत्वाची आहेत. शिक्षकासाठी आणखी मृद कौशल्ये म्हणजे समूहकार्य होय.सहकार्य शील कुशल शिक्षण समुदायांवर भर दिल्याने, शाळेत नावीन्य आणण्यासाठी किंवा आव्हाने पेलण्यासाठी कार्य करणे अधिक महत्त्वाचे बनले आहे. शैक्षणिक प्रणालीमध्ये सहकार्य वृत्तीने परस्पर उद्दिष्टे साध्य करणे आणि ते साध्य करण्यासाठी व्यवहार करणे महत्वाचे आहे. विद्यार्थी, पालक, सहकारी, प्रशासक आणि पर्यायी प्रमुख भागधारकांवर शिक्षकामधील कौशल्ये प्रभाव पाडतात. समस्या सोडवणे एक महत्त्वाचे कौशल्य आहे. शाळेतील अंतर्गत आणि बाह्य समस्यांचा शैक्षणिक परिणामांवर नकारात्मक परिणाम होतो. संघर्ष कमी करणे असो किंवा विद्यार्थ्याच्या शिक्षणाच्या दृष्टीकोनात प्रवेश करणाऱ्या जीवनातील त्रुटींमधून कार्य करणे असो, शिक्षक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तयार असले पाहिजे.

२. **संशोधनाची गरज:**

मृद कौशल्ये शिक्षकाशी संबंधित आहेत. शिक्षक व सहकारी शिक्षक यांच्यामध्ये संवाद साधण्यासाठी शाळेत निर्माण झालेली समस्या

कोणत्या पद्धतीने सोडवायची आहे. मृद कौशल्ये प्रत्येक व्यक्तीचे वैयक्तिक गुणधर्म आहेत, तसेच व्यक्तिमत्व वैशिष्ट्ये, सामाजिक कौशल्ये आणि संवाद कौशल्ये आहेत. मृद कौशल्ये एखाद्या व्यक्तीचे वैशिष्ट्य दर्शवितात. शालेय कामाच्या वातावरणात आणि बाहेरील समवयस्कांशी संवाद साधणे. मृद कौशल्यामध्ये भावना आणि अंतर्ज्ञान यांचा समावेश होतो, जे दुसऱ्या व्यक्तीच्या भावना व्यक्त करण्याच्या आणि त्याचा अर्थ लावण्याच्या क्षमतेसाठी जबाबदार असतात. शिक्षकांना त्यांच्या व्यवसायात उत्कृष्ट होण्यासाठी या सर्व क्षेत्रात अत्यंत कुशल असणे आवश्यक आहे.शिक्षकासाठी केवळ दर्जेदार व्याख्यान देणे महत्त्वाचे नाही; त्यांना एकाच वेळी ज्ञान, कौशल्ये आणि मूल्ये प्रसारित करण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. शिक्षकांसाठी मृद कौशल्ये हे त्यांना शिकवणाऱ्या विशिष्ट विषयाचे सखोल ज्ञानाइतकेच महत्त्वाचे आहे.संभाषण कौशल्याद्वारे शिक्षक विद्यार्थ्यांच्या समस्यांवर सर्जनशील आणि प्रभावी उपाय सादर करू शकतात. शिक्षकांसाठी एकापेक्षा जास्त मृद कौशल्ये महत्त्वपूर्ण आहेत जेणेकरून विद्यार्थ्यांना या कौशल्यांची माहिती होईल आणि या अद्भुत कौशल्यांचा समावेश करण्यासाठी पुढे जाण्यासाठी नेतृत्व असणे गरजचे आहे. विद्यार्थी, पालक, महाविद्यालयीन व्यवस्थापन आणि त्यामुळे समुदायाकडून प्रभावीपणे काम करण्यास आणि आदर मिळविण्यास मदत करतात.

३. **संशोधनाचे महत्व :**

आजच्या डिजिटल युगात शिक्षणात झपाट्याने बदल होत आहे.सर्वच क्षेत्रासोबत शिक्षणामध्ये देखील बदल होत आहे.या बदलत्या परिस्थितीत शिक्षकी व्यवसायाच्या जगात टिकून राहण्यासाठी सॉफ्ट कौशल्ये महत्त्वपूर्ण आहेत. सॉफ्ट कौशल्ये ही केवळ कार्यालयीन कर्मचाऱ्यांमध्ये असणे गरजेचे नसून इतर शिक्षकामध्येही असणे आवश्यक आहे.शाळेत इच्छित शैक्षणिक परिणामांसाठी कार्य कौशल्य असलेले शिक्षक आजच्या

विद्याशाखांमध्ये मोठी भूमिका बजावतात. शाळा आणि विद्यार्थ्यांमध्ये, प्रत्येक औपचारिक आणि अनौपचारिकपणे समर्थन देण्याची क्षमता यामुळे विकसित होते. सॉफ्ट कौशल्यामुळे शिक्षकाला व्यक्ती इतरांशी संवाद साधण्यासाठी महत्वाचे आहे. सॉफ्ट कौशल्ये महत्वाचे आहेत कारण ते शिक्षकांना त्यांच्या विद्यार्थ्यांशी आणि सहकाऱ्यांशी प्रभावीपणे संवाद साधू शकतात. शिक्षक ही कौशल्ये शाळांमध्ये नातेसंबंध निर्माण करण्यास आणि विश्वास वाढविण्याकरिता महत्वाचे आहेत.भावी शिक्षकांना चांगली संभाषण कौशल्ये अत्यावश्यक आहेत.शैक्षणिक संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना प्रगती घडवण्यात मदत करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

४.समस्या विधान :

शिक्षणशास्त्र महाविद्यालयामधील शिक्षक प्रशिक्षणार्थ्यासाठी मृदू कौशल्ये मार्गदर्शक संचाचे विकसन व त्याचा परीणामकारकतेचा अभ्यास

५.समस्येचे स्पष्टीकरण :

५.१ संकल्पनात्मक व्याख्या

१. शिक्षणशास्त्र महाविद्यालय - शिक्षणशास्त्र महाविद्यालय ही अशी संस्था आहे कि जिथे विद्यार्थी शिक्षक होण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण घेत असतात.

२. शिक्षक प्रशिक्षणार्थी - शिक्षक प्रशिक्षणार्थी पदवीधर विद्यार्थी असतो जो शिक्षणशास्त्रातील पदवीसाठी प्राप्त करण्यासाठी प्रमाणित शिक्षकाच्या देखरेखीखाली शिक्षण घेत असतो.

३. मृद कौशल्ये- मृद कौशल्ये ही सामान्यत: मृद कौशल्यात संवाद कौशल्य नेतृत्व गुण व्यक्ती संबध ,समस्या निवारण,कार्य नैतिकता, समस्या निवारण,वेळेचे व्यवस्थापन,सहकार्य इत्यादी कौश्ल्यांचा समावेश होतो.कोणत्याही व्यक्तीला जीवनात यशस्वी होण्यासाठी मृदू

कौशल्यांची आवश्यकता असते ,मग ती व्यक्ती कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असो.शिक्षकांकडे मृदू कौशल्ये असते.शिक्षक विद्यार्थ्यांना आपल्या प्रयत्नपूर्वक आत्मसात करणे गरजेचे असते किंवा ती अपरिहार्यपणे प्रयत्नपूर्वक आत्मसात करणे गरजेचे असते.शिक्षक विद्यार्थ्यांना आपल्या अध्ययनातून अध्ययनासाठी सहकार्य करीत असतो.सहकार्य परिणामकारकता करण्यासाठी शिक्षकांना ही मृदू कौशल्ये सहाय्यभूत होत असतात.

५.२ कार्यात्मक व्याख्या

प्रस्तुत संशोधनामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यामध्ये आवश्यक असणा-या मृद कौशल्यांचा विचार केला आहे.

१. शिक्षणशास्त्र महाविद्यालय : प्रस्तुत संशोधनात संशोधन अभ्यासासाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचा विचार केला जाणार आहे.
२. शिक्षक प्रशिक्षणार्थी : प्रस्तुत संशोधनात शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्याच्या विचार केला जाणार आहे.
३. सॉफ्ट कौशल्ये : प्रस्तुत संशोधनात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यामध्ये आवश्यक मृद कौशल्यांचा विचार केला जाणार आहे.
४. संच विकसन : प्रस्तुत संशोधनात मृद कौशल्यावर आधारित तयार केलेली पुस्तिका तयार करून संशोधनात तिचा वापर करण्यात येईल.

०६. संशोधनाची उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यामध्ये आवश्यक असणा-या मृद कौशल्यांचा अभ्यास करणे .

२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार प्रशिक्षणार्थ्यामध्ये आवश्यक मृद कौशल्यांची निश्चिती करणे .

३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार मृद कौशल्यांच्या मार्गदर्शक संचाचे विकसन तयार करणे.

४. मृद कौशल्य मार्गदर्शक संचाची शिक्षणशास्त्र महाविद्यालय प्रशिक्षणार्थ्यामध्ये अमलबजावणी करणे.

५. मृद कौशल्य मार्गदर्शक संचाच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यामधील परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

०७ .संशोधन साहित्याचा आढावा :

प्रस्तुत संशोधनात खालीलप्रमाणे संबधित साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

७.१ नागन (2015) : व्यावसायिक प्रशिक्षणातून मृद कौशल्यांचा विकास करायची गंभीर समस्या ओळखण्याचा प्रयत्न केला आणि असे आढळले की वर्गाचे मोठे आकार, शैक्षणिकदृष्ट्या खूप केंद्रित असणे आणि प्रशिक्षणाचा कालावधी यामुळे मृद कौशल्ये विकसित करण्यामध्ये प्रशिक्षण अपयशी ठरते . एक उपाय म्हणून, प्रत्येक कोर्स डिझाइनमध्ये सॉफ्ट कौशल्याचे एकत्रीकरण सुनिश्चित करण्यासाठी एम्बेडेड मॉडेलचा वापर संशोधकांनी प्रस्तावित केला.

७.२ **बालकृष्ण आणि अंबुथासन** (2016) : यांनी नमूद केले की ग्रामीण आणि शहरी शिक्षक त्यांच्या संघ-निर्माण कौशल्यांमध्ये लक्षणीय भिन्न आहेत. अनुदानित आणि खाजगी शाळेतील शिक्षकांना संप्रेषण, संगणक कौशल्ये, संघटन क्षमता, नेतृत्व आणि संघ-निर्माण कौशल्य यामध्ये लक्षणीय भिन्न आहेत.

७.३ **आयोडन (2016)**: यांनी संभाव्य पूर्व प्राथमिक शाळेतील शिक्षकांची मृद कौशल्ये आणि उच्च शिक्षणातील मृद कौशल्ये यांच्यातील परस्परसंबंध नोंदवला.

७.४ **सालोवे आणि मेयर (1990)** : यांनी प्रथम भावनिक बुद्धिमत्तेच्या तत्त्वांवर चर्चा केली. भावनिक बुद्धिमत्तेची व्याख्या म्हणजे एखाद्या व्यक्तीची त्याच्या भावना ओळखण्याची, त्यांच्या भावना व्यवस्थापित करण्याची क्षमता होय.

भविष्यातील वर्तनावर अपेक्षित परिणाम करण्यासाठी सॉफ्ट कौशल्याची भूमिका महत्वाची आहे.

७.५ **गोलेमन (1995)** : यांनी भावनिक बुद्धिमत्ता सिद्धांत ओळखला. गोलेमनने वर्णन केलेल्या भावनिक बुद्धिमत्तेच्या चार क्षेत्रांमध्ये आत्म-जागरूकता, स्व-व्यवस्थापन, सामाजिक जागरूकता आणि नातेसंबंध ही सॉफ्ट कौशल्ये आहेत. गोलेमन यांनी असे मानले की मृद कौशल्यांची चार क्षेत्रे व्यक्तीवर प्रभाव पाडतात.

०८. संशोधन परिकल्पना :

८.१ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांमध्ये मृद कौशल्य मार्गदर्शक संचाचे निकषानुसार नियोजन करणे.

८.२ शून्य परिकल्पना :

८.२.१. मृदु कौशल्य मार्गदर्शक संचानुसार शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यामध्ये सॉफ्ट कौशल्य पूर्व चाचणीत आढळून येत नाहीत.

८.२.२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार मृद कौशल्ये व शिक्षक व्यवसाय यामध्ये परस्पर संबध असतो.

८.२.३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार निर्धारित कौशल्य व प्रशिक्षणार्थ्यामध्ये असणारी मृद शिक्षक/शिक्षण कौशल्ये यामध्ये फरक आढळून येत नाही.

०९. संशोधनाची गृहीतके :

१. शिक्षणशास्त्र महाविद्यालय प्रशिक्षणार्थ्यामधील मृदु कौशल्य व सॉफ्ट कौशल्य मार्गदर्शक संच यातील कौशल्य यामध्ये फरक आढळून येत नाही.

२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सॉफ्ट कौशल्य मार्गदर्शक संचानुसार शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यामध्ये मृद कौशल्य विकसित करता येतात.

३.शिक्षण/शिक्षक मृद कौशल्ये मार्गदर्शक संचानुसार शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यामध्ये मृद शल्य परिणामकारकरित्या विकसित करता येतात.

१०. संशोधनाची व्याप्ती :

१. प्रस्तुत संशोधन हे शिक्षणशास्त्र महाविद्यालय प्रशिक्षणार्थ्यापुरते आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे मृदु कौशल्य विकसन करिता महत्वाचे आहे.

३. प्रस्तुत संशोधन हे कोल्हापूर जिल्हयातील शिक्षणशास्त्र

महाविद्यालयापुरते मर्यादित आहे.

४. प्रस्तुत संशोधनात शिक्षणशास्त्र महाविद्यालय प्रशिक्षणार्थ्यांमध्ये मृदु कौशल्य विकसित करण्यात येणार आहे.

११. **संशोधनाची मर्यादा:**

१. प्रस्तुत संशोधन हे मराठी माध्यमाचा शिक्षणशास्त्र महाविद्यालयापुरते मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे बी.एड.अभ्यासक्रमापुरते मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधन हे सन २०२३ ते २०२४ या कालावधीत केले जाणार आहे.

१२. संशोधनाची पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधक प्रायोगिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. यामध्ये समान गट अभिकल्पाची निवड करून प्रायोगिक पद्धतीने संशोधन केले जाणार आहे.

१३. संशोधनाची जनसंख्या आणि नमुना निवड :

१३.१ जनसंख्या

शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणा-या प्रशिक्षणार्थी प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या आहे.

समान गट अभिकल्प – (The equivalent or parallel group design)

१. प्रायोगिक गट

प्रायोगिक उपायांची धनमात्रा इतर सर्व परिस्थिती समान

२. नियंत्रित गट

प्रायोगिक उपायांचा अभाव इतर सर्व परिस्थिती समान

१३.२ नमुना निवडीची पद्धती

प्रस्तुत संशोधनाकरिता यादृच्छिक नमुना निवड पद्धती वापरली आहे.तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील १७ शिक्षणशास्त्र महाविद्यापैकी १० महाविद्यालयाची निवड करण्यात येईल .

१३.३ नमुना /न्यादर्श

कोल्हापूर जिल्ह्यातील १० शिक्षणशास्त्र महाविद्यातील बी.एड.शिक्षण घेणा-या ४०० प्रशिक्षणार्थ्यांची निवड प्रस्तुत संशोधनासाठी करण्यात येईल.



१४.माहिती संकलनाची साधने व तंत्रे :

प्रस्तुत संशोधनात प्रश्नावली या माहिती संकलन साधनाचा वापर संशोधक करणार आहे. तसेच सॉफ्ट कौशल्य मार्गदर्शक संचाचे विकसन करून शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यामध्ये मृद कौशल्ये विकसित झालेबाबत संपादन चाचणीचा वापर करण्यात येईल.

१४.१ संख्याशाशास्त्रीय साधने व तंत्रे

प्रस्तुत संशोधनाकरिता

१.टक्केवारी

२.मध्यमान

३.टी- परिक्षीका

या संख्याशाशास्त्रीय साधनांचा वापर केला जाईल.

१५. संशोधनाची चले:

शैक्षणिक निरीक्षणानुसार परिणाम करणारा कोणताही घटक म्हणजे चल होय .

प्रस्तुत संशोधनात प्रायोगिक संशोधन पद्धतीने केले असल्याने संशोधकाने चलाची निश्चिती पुढीलप्रमाणे कली आहे.

१५.१ स्वाश्रयी चले

१. सॉफ्ट कौशल्य

२. अध्ययन निष्पती निकष या मूल्यमापन निकषाद्वारे अध्यापन

१५.२ आश्रयी चले

१. प्रशिक्षणार्थ्याचे संपादन

२. प्रशिक्षणार्थ्याचे वर्तन बदल

१५.३ नियंत्रित चले

१. अध्यापन कालावधी

२. सॉफ्ट कौशल्य मार्गदर्शक संच

३. प्रशिक्षणार्थी संख्या

१६. संशोधनाची कार्यवाही :

प्रस्तुत संशोधनात संशोधक प्रथम कोल्हापूर जिल्ह्यातील १० शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील १५ शिक्षकांची निवड करून त्यांना मृद कौशलये मार्गदर्शक संचाचा वापर करण्यासंदर्भातील मार्गदर्शन करण्यात येईल. यानंतर प्रायोगिक पद्धतीमध्ये समान गट अभिकल्प यामध्ये प्रायोगिक गट व नियंत्रित गट यांची निवड संशोधकांनी घेतलेल्या पूर्व चाचणीचा आधारे केली जाणार आहे.

अ.क्र.	प्रायोगिक गट	नियंत्रित गट
०१.	पूर्व चाचणी	पूर्व चाचणी
०२.	प्रायोगिक उपायांची धनमात्रा	प्रायोगिक उपायांचा अभाव
०३.	अंतिम चाचणी (x१)	अंतिम चाचणी (x२)

४. दोन गटांना अंतिम चाचणीत मिळालेल्या गुणांची तुलना केली जाणार आहे. यासाठी t-test या सांख्यिकी परिमाणाचा वापर करून सहसंबंध अभ्यासला जाईल. तसेच वर्तनबदलाची निश्चिती करण्यासाठी निरीक्षण सूचीव्दारे निरीक्षण करून परिणाम अभ्यासला जाणार आहे.

१७. संशोधनाचा कार्यवाहीची रूपरेषा:

अ.क्र.	तपशील	कालावधी
०१	संशोधनाचा आराखडा सादर करणे.	सप्टेंबर २०२३
०२	संशोधनाची साधन निर्मिती करणे	ऑक्टोबर २०२३
०३	माहितीचे संकलन करणे	फेब्रुवारी २०२४

०४	माहितीचे विश्लेषण करणे	एप्रिल २०२४
०५	अहवाल लेखन करणे	जुलै २०२४
०६	अहवाल टंकलेखन बांधणी व सादरीकरण करणे	सप्टेंबर २०२४

१८. संशोधन खर्चाचे अंदाजपत्रक :

अ.क्र.	तपशील	अपेक्षित खर्च
०१.	आराखडा निर्मिती	१०००
०२.	प्रश्नसंच निर्मिती	७०००
०३.	पुस्तक खरेदी	८०००
०४.	प्रवास खर्च	१५०००
०५.	अहवाल लेखन	३००००
०६.	अहवाल बांधणी	५०००
०७.	इतर खर्च	५०००
	एकूण खर्च	७१०००

१९. संशोधन अहवाल प्रकरण योजना :

प्रकरण १ : प्रस्तावणा

प्रकरण २ : संबधित साहित्याचा आढावा

प्रकरण ३ : संशोधन पद्धती

प्रकरण ४ : संशोधन माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण ५ : सारांश ,निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भसूची

परिशिष्ट

२०. संदर्भग्रंथ:

१. अँग्रीस्ट, जे. डी., आणि लावी, व्ही. (2001). शिक्षक प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम जर्नल ऑफ लेबर इकॉनॉमिक्स, 19(2), 343-369.

२. बालकृष्णन, व्ही., आणि अंबुथासन, ए. (2016). परिसर, व्यवस्थापनाचा प्रकार आणि शिक्षकांच्या श्रेणीच्या संबंधात शिक्षकांच्या सॉफ्ट स्किल्सचा अभ्यास. जर्नल ऑफ टीचर एज्युकेशन अँड रिसर्च, 11(01), 69-77.

३. मुळे रा.श. व उमाटे वि.म. (१९९८). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे,नागपूर विद्या प्रकाशन.

४. भिंताडे वि.रा. (१९८९). शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे नूतन प्रकाशन.८ महाराष्ट्र   राज्य

५. ह.ना.जगताप (एप्रिल २००७). शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, पुणे,नूतन प्रकाशन.

संशोधक	संशोधन मार्गदर्शक
(श्री गजानन अन्ना सोलापुरे)	(डॉ.व्यंकट के.कदम)